# जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी

संदर्भ :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई गोपनीय पत्र क्रमांक बी.(जन) ५६०१/५७/२०२४/१६४९, दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४.

२. जिल्हा न्यायालय, परभणी यांनी दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द केलेली शिपाई या पदाची निवड यादी.

## कार्यालयीन आदेश क्र. ( 320 )

मा. उच्च न्यायालयाचे संदर्भीय पत्र क्र.१ मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी मार्फत दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४ रोजी शिपाई या पदाची निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. शिपाई पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना नेमणुक देणे बाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी ह्या खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहेत.

सदरचे आदेश दिनांक १८ ऑक्टोबर, २०२४ पासुन अंमलात येतील.

| अ. क्र. | निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवाराचे नांव. | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री. पंढरीनाथ मोतीराम ढोणे, शिपाई पदाची निवड यादी सन-२०२४ मधील अ.क्र. (०५) वरील उमेदवार. | यांना शिपाई या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत असून त्यांची नेमणुक दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, सेलू यांचे आस्थापनेवर श्री. डी. वाय. मगर, शिपाई यांच्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे. |

**नेमणुकीच्या अटी व शर्ती :**

०१. उपरोक्त नवनियुक्त उमेदवाराने कामावर रुजु झाल्यानंतर कार्यालय प्रमुखांनी उमेदवारास एकनिष्ठतेची शपथ द्यावी व वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे आणि उमेदवाराकडुन नियमानुसार आवश्यक ती कागदपत्रे घ्यावी.

०२. उमेदवाराने एक महिण्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे मुळ वेतन सरकार जमा करावे लागेल.

०३. वरील उमेदवारास शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ आणि शासन निर्णय क्र. अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७/०७/२००७ नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागु राहील.

०४. नवनियुक्त उमेदवाराने प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु व्हावे. जर विहीत मुदतीत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु झाला नाही तर त्याचे नांव निवड यादीतुन कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

०५. नवनियुक्त उमेदवार संबंधीत आस्थापनेवर रुजु झाला किंवा कसे ? याबाबतचा अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुखांनी जिल्हा न्यायालयास त्वरीत सादर करावा.

17/10/2024
(उज्वला म. नंदेश्वर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.

जा.क्र./आस्था/ब-४/ 11070 /२०२४
जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी
दिनांक : १७ ऑक्टोबर, २०२४.

<u>प्रतिलिपी माहिती व योग्य त्याकार्यवाहीस्तव</u> :-

०१– मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सेलू/पूर्णा.
०२– प्रबंधक, जिल्हा न्यायालय, परभणी.
०३– मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे स्वीय सहाय्यक, जिल्हा न्यायालय, परभणी.
०४– अधीक्षक (प्रशासन), जिल्हा न्यायालय, परभणी.
०५– सहा. अधीक्षक (रोखा व वित्त), जिल्हा न्यायालय, परभणी.
०६– श्री. पंढरीनाथ मोतीराम ढोणे, रा. पांगरा तर्फे लासीना पोस्ट पिंपळा लोखंडे, ता. पूर्णा, जि. परभणी. (मो.नं. ८३२९०९४००७)
**मार्फत – मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पूर्णा.**
०७– संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, परभणी यांना देऊन निर्देशीत करण्यात येते की, सदर कार्यालयीन आदेश जिल्हा न्यायालय परभणीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

प्र. प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, परभणी.